सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक बांधकाम विभाग

**कार्यकारी अभियंता,** यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १,
रेसिडेन्सी रोड, सदर, नागपूर

दुरध्वनीक्र. ०७१२-२५६५४४९
E-mail ID:- div1nagpur.ee@mahapwd.gov.in


जा.क्र./ 2040 /२०२६

दि. 30 MAR 2026 /२०२६

**प्रति,**

**वृक्ष संवर्धक,**
**नागपूर महानगरपालिका,**
**नागपूर**

**विषय :-** नागपूर जिल्हा व तालुक्यातील डिप्टी (सिग्नल) ते कावळापेठ रस्त्यावर किमी ६/०० अंडरपासच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या एक पिंपळ प्रजातीच्या (हेरीटेज) झाडास तोडण्याची परवानगी मिळणेबाबत.

**संदर्भ :-** १. या कार्यालयाचे पत्र क्र.१६०१०/२०२६, दि.१८.०२.२०२६
२. आपले कार्यालयीन प त्र क्र.NMC/OWL/GRDN/२०२५-२०२६/४८८५९, दि.२५.०३.२०२६.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत मंजुर नागपूर जिल्हा व तालुक्यातील डिप्टी सिग्नल ते कावळापेठ रस्त्यावर किमी ६/०० अंडरपासच्या बांधाकामाच्या ठिकाणी येत असलेल्या एक पिंपळ प्रजातीच्या झाडास तोडण्याकरिता परवानगी मागण्यात आली होती.

त्याअनुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये अंडरपास बांधकामास अडथळा निर्माण करणाऱ्या एक पिंपळ प्रजातीच्या (हेरीटेज) झाडाची वृक्ष प्रत्यारोपण करण्याच्या मोबदल्यात महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै १६, २०२१, आषाढ २५, शके १९४६ अन्वये प्रकरण ६ मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील पोट कलम (४) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मुळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वया इतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान ६ फुट इतक्या उंचीची ५९ नग नविन देशी प्रजातीच्या झाडांची लागवड करुन सात वर्षे देखभाल करण्याचे निर्देश प्राप्त आहेत.

त्यानुसार नागपूर महानगरपालिका हद्दीतील सेन्ट्रल जेलच्या परिसरात ६ फुट इतक्या उंचीची ५९ नग नविन देशी प्रजातीच्या झाडांची लागवड करण्यात आलेली आहे. सदर लागवडीचे छांयाचित्रा प्रत या पत्रासोबत संलग्न करुन सादर करण्यात येत आहे.

तरी, अंडरपास बांधकामास अडथळा निर्माण करणाऱ्या एक पिंपळ प्रजातीच्या (हेरीटेज) झाड तोडण्याची परवानगी देण्याता यावी, हि नम्र विनंती. जेणे करुन अंडरपासच्या उद्घाटनाचे नियोजन करणे सोईचे होईल.

**सहपत्र :** लागवडीचे छांयाचित्र

**(लक्ष्मीकांत राऊळकर)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१**
**नागपूर**

**प्रतिलिपी :** उपविभागीय अभियंता, सा.बां.(प्रकल्प) उपविभाग, नागपूर यांना माहितीस अग्रेषित.